


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २९ डिसेंबर, १९४८ अंक ५०

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. वि. केळकर M. A., LL. B (वकील) ( अध्यक्ष )

श्री. बी. बी. वाळवेकर ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.**

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमचीं वैशिष्ट्यें—

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स ताबडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

## शेतकरी कर्जनिवारण कायदा

कापडी किं. ४॥ रु. कागदी किं. ४ रु.

| | |
|---|---|
| नवीन भाडें नियंत्रण कायदा | किं. २ रु. |
| मुंबई सावकारी कायदा | किं. २॥ रु. |
| कूळ कायदा, आवृत्ति ३ री | किं. ३ रु. |
| द्विभार्या प्रांतबंधक कायदा | किं. १ रु. |
| हिंदू घटस्फोट कायदा | किं. १ रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टिपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं तयार केलीं आहेत.

पत्ता— लॉ ॲकॅडेमी, ७१० सदाशिव, पुणें २.

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**तारेच्या खांबांचें नुकसान**—गेल्या वादळांत मुंबई प्रांतांत टेलिग्राफच्या ७,००० खांबाचें नुकसान झालें. त्यापैकीं २,००० खांब तर प्रत्यक्ष उपटले गेले.

**मधुसूदन मिल्स, मुंबई**—ह्या गिरणीची विशेष साधारण सभा ता. २८ डिसेंबर रोजीं भरणार होती. सभेंत येणाऱ्या दोन ठरावांमुळें, कंपनीच्या भागीदारांत बरीच खळबळ उडाल्याचें समजतें. एका ठरावानें कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमध्यें दुरुस्ती करण्यांत येणार आहे. दुसऱ्या ठरावाप्रमाणें कंपनीचे मॅनेजिंग एजंट मे. कदानी ब्रदर्स ह्यांच्या राजीनाम्याला भागीदारांची मंजुरी मिळविण्यांत येणार आहे. ता. १ जुलै, १९४७ पासूनचा मॅनेजिंग एजन्सीचा मुशाहिरा सोडण्याबद्दल आणि राजीनाम्याबद्दल नुकसानभरपाई म्हणून त्यांना १९,७५,००० रुपये देण्यांत यावे, असें दुसऱ्या ठरावांत म्हटलें आहे.

**हिंदुस्थान कर्ज मागणार ?**—हिंदुस्थानांतील अन्नधान्याची निर्मिती वाढविण्यासाठी शेतीच्या यांत्रिक अवजारांची गरज आहे. हीं यंत्रें विकत घेण्यासाठी हिंदुस्थान सरकार इंटर नॅशनल मॉनेटरी फंडांतून १०० कोटी रुपयांचें कर्ज मागण्याचा संभव आहे, असें अन्नमंत्रि श्री. जयरामदास दौलतराम ह्यांनीं नुकतेच उद्गार काढले. पुढील महिन्यांत फंडाचे प्रतिनिधी हिंदुस्थानांत येणार आहेत, त्यावेळीं ह्यासंबंधीं चर्चा होईल असें समजतें.

**मार्शल योजनेंतील मदतीचा दुरुपयोग**—अमेरिकेच्या व्यापार खात्यानें, ब्रिटन, हॉलंड व बेल्जम ह्या देशांनीं मार्शल योजनेप्रमाणें मिळालेल्या आर्थिक मदतीचा दुरुपयोग केला आहे असा आरोप केला आहे. ह्या बाबतींत अमेरिकेचें व्यापार खातें चौकशी करीत आहे. ब्रिटनमधून अमेरिकेला निर्यात होणाऱ्या अल्युमिनिअमसंबंधीं कांहीं वाद उत्पन्न झाला आहे.

**हिंदी कापडाची निर्यात**—रुंद पन्ह्याचें आणि तलम कापड डॉलर हुंडणावळीच्या देशांना निर्यात करण्याचे बाबतींतील निर्बंध हिंद सरकारनें रद्द करण्याचे ठरविलें आहे. ह्या कापडांत हातमागाच्या कापडाचाहि अंतर्भाव करण्यांत आला आहे. मध्यम प्रतीच्या कापडाच्या निर्मितीच्या २५ टक्के कापडच निर्यात करण्याचें बंधन गिरण्यांवर होतें, तेंहि रद्द करण्यांत आलें आहे. टॉवेल, पलंगपोस आणि रुमाल ह्यांचीही निर्यात आतां करतां येईल.

**नोकरांना संचालक मंडळावर जागा**—लंडनमधील एका कंपनीनें आपल्या सहा नोकरांना संचालक मंडळावर उमेदवार-डायरेक्टर घेण्याचें ठरविलें आहे. त्यांना संचालकाच्या कामाचें शिक्षण देण्यांत येणार आहे. कायदेशीर दृष्ट्या ह्या नव्या संचालकांना 'संचालक' म्हणता येणार नाहीं. त्यांना संचालक मंडळाच्या सभांना हजर राहता येईल. परंतु, मताधिकार असणार नाहीं. सहा जणांपैकीं पांच जण कंपनींत अगदी खालच्या हुद्यावर काम करता करता वर चढले आहेत. तिघेजण तर साधे शिपाईच होते. कांहीं दिवसांनीं ते खरेखुरे डायरेक्टर होतील.

**१६ जानेवारीला बोनस दिन**—मुंबईच्या कामगार संघाची १८ वी वार्षिक सभा नुकतीच भरली होती. ता. १६ जानेवारी, १९४९ हा दिवस बोनस दिन म्हणून पाळण्यांत यावा, असें सभेंत ठरविण्यांत आलें. ह्या दिवशीं, कापड गिरण्यांतील कामगार तीन महिन्यांचा पगार बोनस म्हणून देण्यांत यावा, अशी मागणी करणार आहेत.

**हरिजनांची वेठबिगार**—दक्षिण कर्नाटकांत कांहीं जमीनदार हरिजनांना लांब मुदतीच्या भाडेपट्यानें कामावर लावतात असें आढळून आलें आहे. हे हरिजन मुख्यतः शेतावर काम करणारे मजूर असतात. ह्या प्रकरणाबाबत मद्रास सरकारनें चौकशीला प्रारंभ केला असून चौकशीचें काम हरिजनांच्या एका संस्थेमार्फतच चालू आहे.

**निर्वासितांना अधिक शिधा**—निर्वासितांच्या छावणींतील निर्वासितांना अधिक मुक्तहस्तानें शिधा-वांटप करण्याचे हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. हिंद सरकारला त्यामुळें वार्षिक ५·४ कोटी रुपये अथवा रोज १·५ लाख रुपये अधिक खर्च येणार आहे. चालू वर्षाच्या आरंभीं छावण्यांतून ३,६७,८०० निर्वासित होते. आतां त्यांची संख्या जवळ जवळ ८ लाख झाली आहे.

**बडोद्यांत नवें कॉलेज**—बडोद्यांत स्त्रियांसाठी एक नव कॉलेज काढण्याचें घाटत असून कॉलेजला सरकार आर्थिक मदत करण्यास तयार असल्याचें समजतें. कॉलेजमध्यें गृहशास्त्र शिकविण्याची खास व्यवस्था करण्यांत येणार आहे. सरकारी मदत १० लाख रुपयांपर्यंत होणार आहे आणि कॉलेजची व्यवस्था ट्रस्टींचें एक बोर्ड पहाणार आहे.

**पोलंडमध्यें शिधावांटप संपणार**—१ जानेवारी, १९४९ पासून पोलंडमधील सर्व तऱ्हेचें शिधावांटप बंद करण्यांत येईल असें त्या सरकारच्या व्यापार खात्यातर्फे जाहीर करण्यांत आलें आहे. त्याच दिवशीं वेतनाच्या पद्धतींत सुधारणा करण्याच्या कामालाहि प्रारंभ होणार आहे.

**ब्रिटनला कॅनडांतील गहूं**—कॅनडाजवळ असलेल्या २३·६ कोटी बुशेल्स गव्हापैकीं जवळ जवळ ९९ टक्के गहूं ब्रिटनला निर्यात करण्यांत येणार आहे.

**अमेरिकेंतील गव्हाचें पीक**—१९४९ सालीं अमेरिकेंत हिंवाळी गव्हाचें पीक ९६,४८,०८,००० बुशेल्स येईल असा अंदाज सरकारी शेतकी खात्यानें प्रसिद्ध केला आहे. १९४८ सालचा अंदाज ९९,००,९८,००० बुशेल्स करण्यांत आला होता.


तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील- सुती-गरम-रेशमी -खादीचें माहेरघर- **खादी मन्दिर** २६२, बुधवार पेठ ढमढेरे बोळाजवळ पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. २९ डिसेंबर १९४८



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## हिंदचा परराष्ट्रीय व्यापार

### निर्गत वाढली, तरी आयातहि अधिक झाली.

हिंदनें १९४८–४९ च्या पहिल्या सहामाहींत म्हणजे सप्टेंबर, १९४८ अखेरपर्यंत एकूण २१० कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्गत केली आणि ह्याच मुदतींत २३२ कोटी रुपये किंमतीचा माल आयात केला. आलेल्या मालाची फिरून निर्गत झाली, त्याची किंमत ४३/४ कोटी रुपये भरली. अशा रीतीनें, परराष्ट्रीय व्यापाराच्या आढाव्यांत १७ कोटी, ९४ लक्ष रुपयांची प्रतिकूल तफावत पडली. म्हणजे, आयातीपेक्षा एवढी निर्गत ज्यास्त झाली.

निर्गतीचे मालांत ताग, चहा, कपास व कपास कापड, तेलें, कातडी, इत्यादि प्रमुख होतीं; तर यंत्रसामुग्री, धान्य, डाळी, कपास, धातू, वहानें, रसायनें, रंग, औषधें ह्यांचा आयातींत प्रामुख्यानें समावेश झाला. १९४७–४८ च्या पहिल्या सहामाहीच्या आकड्यांशीं तुलना करतांना, तेव्हांचे आकडे अखंड हिंदुस्थाना संबंधीं होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तेव्हांच्या आयात-निर्गतीच्या आकड्यांत सिंध व पूर्व बंगालमधून होणाऱ्या आयात-निर्गतीचा अर्थातच समावेश झालेला नाहीं. तथापि, खालील तुलनात्मक आकड्यांवरून, फाळणीपूर्वीच्या मानानें हिंदनें निर्गत पुष्कळ वाढविली असली, तरी आयातीमध्येंहि तशीच वाढ झाल्याकारणानें, दोहोंमधील प्रतिकूल तफावत कायमच राहिली आहे हें दिसून येईल. हिंदी मालाची निर्गत वाढवून परराष्ट्रीय, विशेषतः डॉलर हुंडणावळ मिळविण्याचा प्रयत्न हिंदनें केला पाहिजे. त्या दृष्टीनें निर्गतीस प्रोत्साहन देण्याचें हिंद सरकारचें धोरण आहे. त्याबरोबरच आयातीवरील युद्धकालीन नियंत्रणें उठविल्यामुळें आयात वाढत आहे आणि परराष्ट्रीय व्यापारांतील तफावतीची प्रतिकूलता कायमच आहे! ह्या संबंधांतील धोरण आखतांना देशी उद्योगधंद्यांचें नुकसान होऊं नये ही दृष्टीही ठेवली पाहिजे. खालील तक्त्यांत तपशील दिला आहे:—

### आयात–निर्गत

| | सप्टेंबर १९४८ अखेरचे ६ महिने | सप्टेंबर १९४७ अखेरचे ६ महिने |
|---|---|---|
| | ( आकडे लक्ष रुपयांचे ) | |
| आयात | २३२,४६ | २०९,६२ |
| निर्गत | २०९,७५ | १८७,६८ |
| फिरून निर्गत | ४,७७ | ३,२२ |
| तफावत | –१७,९४ | –१८,७२ |

### निर्गत कोणत्या मालाची झाली?

| माल | ३० सप्टेंबर, १९४८ अखेरचे ६ महिने ( लक्ष रुपये ) |
|---|---|
| ताग–सूत–कापड | ७३,६२ |
| चहा | २३,७० |
| कपास–सूत–कापड | २२,८२ |
| कच्चा ताग | १३,५० |
| कच्ची कपास | ११,५९ |
| तेलें | ७,४२ |
| कातडीं | ६,२५ |

### माल आयात कोणता झाला?

| माल | ३० सप्टेंबर, १९४८ अखेरचे ६ महिने ( लक्ष रुपये ) |
|---|---|
| यंत्रसामुग्री | ३९,०६ |
| धान्य | ३६,५२ |
| कपास | २६,६१ |
| तेलें | १८,१७ |
| धातू | १६,३२ |
| वहानें | १४,५१ |
| रसायनें, औषधें | १२,५१ |
| रंग | ९,१४ |
| कटलरी, हार्डवेअर | ६,२० |
| कपास–सूत–कापड | ५,९३ |

### कोणत्या देशांनीं माल घेतला?

| देश | ३० सप्टेंबर १९४८ अखेरचे ६ महिने ( लक्ष रुपये ) |
|---|---|
| **ब्रिटिश साम्राज्य** | |
| ग्रेट ब्रिटन | ४५,४५ |
| पाकिस्तान | २५,९३ |
| सिलोन | ५,५३ |
| कॅनडा | ४,४३ |
| **परदेश** | |
| अमेरिका | ३५,६० |
| ब्रह्मदेश | ६,५० |
| फ्रान्स | ४,७६ |
| चीन | ४,५० |
| अर्जेंटिना | ४,५२ |

### कोणत्या देशांनीं माल पाठविला?

| देश | ३० सप्टेंबर, १९४८ अखेरचे ६ महिने ( लक्ष रुपये ) |
|---|---|
| **ब्रिटिश साम्राज्य** | |
| ग्रेट ब्रिटन | ६३,११ |
| ऑस्ट्रेलिया | १४,१८ |
| पाकिस्तान | ९,९६ |
| केनिया | ६,८० |
| कॅनडा | ४,१२ |

| | |
|---|---|
| परदेश | |
| अमेरिका | ५३,४६ |
| ब्रह्मदेश | ११,९२ |
| इजिप्त | १०,६५ |
| इराण | १०,३६ |
| इटली | ८,५५ |
| अर्जेंटीना | २,७० |

## स्फुट विचार

### कामगारांना कारखाना चालविण्याची संधि

जगांतील घडामोडींचा पडसाद म्हणून गेल्या कांहीं वर्षांत हिंदुस्थानांतहि कारखान्यांच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी होऊं लागली आहे. राष्ट्रीयीकरणाचा इतर तपशील कांहींही असला तरी अशा कारखान्यांतून कामगारांच्या जबाबदारीला अधिक आवाहन करणें प्राप्तच होईल. ह्या दृष्टीनें काश्मिरमधील एक प्रयोग लक्षपूर्वक अवलोकन करण्यासारखा आहे. काश्मीरच्या सरकारनें काश्मीर सिल्क फॅक्टरीची सर्व व्यवस्था त्या कारखान्याच्या कामगारांच्या हातीं देण्याचें ठरविलें आहे. प्रत्यक्ष जबाबदारी अंगावर पडल्यावर कामगार स्वतः पुढाकार घेऊन उत्पादनांत काय सुधारणा घडवून आणतात व आपल्या स्वतःच्या परिस्थितींत कोणता इष्ट बदल घडवून आणतात हें पाहणें, हा वरील प्रयोगाचा हेतु आहे. गेल्या वर्षाच्या मानानें कामगारांनीं अधिक उत्पादन करून दाखविलें, किंवा त्यांनीं रोजच्या सरासरी उत्पादनांत वाढ करून दाखविली तर त्यापासून होणाऱ्या अधिक उत्पन्नाचा अर्धा भाग त्यांना देण्यांत येणार आहे. काश्मीरमधील रेशमाच्या कारखान्यांत रेशमासंबंधीं काम चालणारी बरींच बारिक केंद्रें आहेत. त्यांतील एकाच केंद्रांत हा प्रयोग तूर्त करण्यांत येत असला तरी काश्मीरमधील एका महत्त्वाच्या उद्योगधंद्याचें भवितव्य ह्या प्रयोगाच्या यशापयशावर थोड्याबहुत प्रमाणांत अवलंबून आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. राष्ट्रांतील मोठे धंदे राष्ट्राच्या मालकीचे करण्यापूर्वी छोटेखानी धंद्यांत अशा प्रकारचे प्रयोग केले गेले तर त्यासंबंधींचा अनभव मोठ्या धंद्यांच्या बाबतींतही उपयोगी पडण्यासारखा ठरेल. अर्थात्, प्रत्येक धंद्याचें स्वरूप आणि तांत्रिक संघटना विचारांत घेऊनच राष्ट्रीयीकरणाच्या तपशिलांत इष्ट असा बदल करावा लागेल हें उघड आहे. हिंदुस्थानांत म्हैसूर संस्थानांत रेशमाचा धंदा इतर ठिकाणांपेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर चालतो. काश्मीरमधील प्रयोगाकडे म्हैसूरमधील रेशमाचे कारखानदार आणि कामगार ह्यांनीं बारकाईनें लक्ष ठेवणें उचित होईल.

### लखनौमधील ग्राहकांच्या सहकारी संस्था

लखनौ शहरांत ग्राहकांच्या सहकारी संस्था संघटित करण्याच्या कामाला गेल्या ऑगस्ट महिन्यांत प्रारंभ झाला. आतां तें काम जवळ जवळ पूर्ण होत आलें आहे. लखनौ शहराच्या निरनिराळ्या भागांसाठी एकूण २४ सहकारी संस्थांची जरूरी होती. त्यांपैकीं १४ संस्था संघटित होऊन रीतसर रजिस्टर करण्यांत आल्या आहेत. उरलेल्या १० रजिस्टर होण्याच्या मार्गावर आहेत. ह्या सर्व संस्थांच्या सभासदांची संख्या सुमारें १८,००० इतकी आहे. गेल्या ऑगस्टपासून झालेल्या प्रगतीचें लक्षण म्हणून असें सांगतां येईल कीं, आज लखनौ शहरांत प्रत्येक तीन कुटुंबांपैकीं एक कुटुंब कोणत्या तरी सहकारी संस्थेचा सभासद आहे. तथापि सहकारी संस्थांचा व्याप वाढण्याच्या कामांत अडचणी आहेत त्याही नजरेसमोर ठेवल्या पाहिजेत. स्वस्त धान्याचीं दुकानें उघडण्याच्या कामीं मुख्यतः तीन अडचणी येत आहेत. (१) सर्वसाधारण जनता निरक्षर आहे, (२) सहकारी संस्था संघटित करण्यास लागणारा शिक्षित नोकरवर्ग पुरेसा नाहीं आणि (३) सुरवातीला लागणारें भांडवल जमविणें कठीण जातें. असें असलें तरी ग्राहकांच्या सहकारी संस्थांचा व्याप हळुहळु वाढत आहे. शहरांतील संस्थांनीं आतांपर्यंत सुमारें २,५०,००० रुपये किंमतीच्या मालाचें वांटप केलेलें आहे. ग्राहकांनीं संघटित होऊन सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वावर रोज लागणाऱ्या मालाचें वांटप करणें सध्यांच्या परिस्थितींत अत्यंत आवश्यक झालें आहे. सहकारी बँका व प्रांतिक सरकारें ह्यांनीं अशा प्रकारच्या संस्थांना सल्लामसलत देणें जरूर आहे. मालाचें वांटप करण्याच्या कामीं व्यापाऱ्यांना असलेला अनुभव हळुहळु ग्राहकांच्या संस्थांनाही मिळेल; त्या कामाला कांहीं विशेष प्रकारची कार्यक्षमता लागते असें मुळींच नाहीं. तथापि ग्राहकांच्या सहकारी संस्था ह्या अखेर मालाच्या पुरवठ्यावर अवलंबून आहेत ही महत्त्वाची बाब विसरून चालणार नाहीं.

**सिंधमधील धरण**—कोट्री येथें सिंधू नदीवर बांधण्यांत येणाऱ्या नव्या धरणासाठीं सिंध सरकारनें ५२ लाख रुपये किंमतीच्या यंत्रसामुग्रीची मागणी एका ब्रिटिश कंपनीकडे नोंदविली आहे.

**मद्रास प्रांतांत वेतन-समित्या**—मद्रास सरकारनें दोन प्रांतिक वेतन-समित्या स्थापन करण्याचें ठरविलें आहे. एक शेतीसाठीं आणि दुसरी उद्योगधंद्यासाठीं. ह्याशिवाय दोन्ही समित्यांच्या विभागीय आणि जिल्हानिहाय उपसमित्याही निर्माण करण्यांत येणार आहेत. सरकारच्या किमान वेतनाच्या कायद्याला अनुसरून कामगारांसाठीं किमान मेहनताना ठरविणें हें ह्या योजनेचें कार्य आहे.

**हिंदी गणितज्ञाला आमंत्रण**—टाटा संशोधन शाळेंतील गणिताचे प्राध्यापक श्री. डी. डी. कोसांबी एक वर्षासाठीं युरोपला व अमेरिकेला गेले आहेत. प्रो. कोसांबी ह्यांना शिकॅगो विद्यापीठाकडून आमंत्रण आलें आहे. संयुक्त राष्ट्रसंघाची एक शिष्यवृत्ति त्यांना मिळाली आहे. विजेच्या उपकरणाच्या साह्यानें आंकडेमोड करणाऱ्या नव्या तऱ्हेच्या यंत्रांचा अभ्यास व घडण, ह्याविषयीं ते अभ्यास करणार आहेत.

**ब्रिटनचे चहा मिळविण्याचे प्रयत्न**—ब्रिटिश नागरिकांना दर आठवड्याला २॥ औंस चहा देतां यावा म्हणून अधिक चहा आयात करण्याचे प्रयत्न ब्रिटिश सरकार करीत आहे. सध्या दर आठवड्याला २ औंस चहा ह्याप्रमाणें वाटप करण्यांत येत आहे. चहा पुरविणाऱ्या कंत्राटदारांनीं सरकारला योग्य मुदतींत पुरेसा चहा पुरविला नाहीं, त्यामुळें चहाची अधिक आयात झाल्याशिवाय वांटपाच्या प्रमाणांत वाढ करता येत नाहीं.

**ब्रिटनच्या सायकलींना प्रचंड मागणी**—लंडन येथें सायकली व मोटार-सायकली ह्यांचें एक नुकतेंच प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. ह्या प्रदर्शनांत भाग घेणाऱ्या ब्रिटिश कंपन्यांकडे २ कोटी पौंडांच्या सायकलींच्या व मोटर-सायकलींच्या मागण्या परदेशांतून आल्या आहेत. युद्धपूर्वकालांत ब्रिटनच्या ह्या मालाला इतकी मोठी मागणी कधींही आली नव्हती. ह्या मागणीची रुपयांत किंमत २६ कोटी, ६२ लाख इतकी होते.

# हिंदी कापड धंद्याचें "यूनो"च्या तज्ज्ञांकडून परीक्षण

## महत्त्वाचा प्रगतिपर धंदा

### निरीक्षकांच्या सूचना

### (२)

( श्री. स. वा. दातार. )

विद्यमान परिस्थितीचें तपशीलवार अवलोकन करून निरीक्षकांनीं पुढील सूचना मांडल्या आहेत. कापूस, पूरक साहित्य, यंत्रसामुग्री व सुटे भाग यांची परदेशांतून आयात करण्यासाठी परदेशी चलन जादा प्रमाणांत देण्यांत यावें; कापसाची व इतर तंतुयुक्त पदार्थांची लागवड वाढविण्यांत यावी. यंत्रसामुग्री तयार करणाऱ्या कारखान्यांना उत्तेजन यावें आणि जळण, वाहतुकसाधनें, वीजशक्ती, इमारतसाहित्य व अन्य आवश्यक वस्तूंचा पुरवठा ह्या धंद्यासाठी जादा देण्यांत याव्या; कसबी कामगार तयार करण्यासाठी शिक्षणाच्या सोयी कराव्यात व मुख्यतः उपलब्ध यंत्रससामुग्रीचा जास्तींत जास्त उपयोग व्हावा म्हणून गिरण्यांमधील कामाच्या पाळया वाढविण्यांत याव्यात. उत्पादन व व्यवस्थापन कौशल्य वाढविण्यासाठी तज्ज्ञ अनुभवी मंडळींचें एक स्थायी सल्लागार मंडळ नेमण्यांत यावें. आस्ट्रेलियांत अशा मंडळानें फार चांगलें काम करून दाखविलें आहे. ह्या निरीक्षक मंडळाच्या प्रमुख सूचना आहेत. विशेषतः सूतगिरण्या व सूतखातीं ह्यांमध्यें एक पाळी जादा काढावीच व तूर्त सूत शिल्लक उरेल तर तें हातमागांना व विणकामास यावें. परदेशी चलनाचें दुर्भिक्ष व महाग भाव ह्यामुळें अमेरिका, ब्राझिल व पेरू ह्या देशांतून कापूस आयात करतां येणें अशक्यप्राय आहे. तेव्हां दरसाल १० लाख गाठी कापूस पाकिस्तानांतून निर्वेध मिळविणें आवश्यक आहे व लांब धाग्याच्या कापसाची हिंदुस्थानांतील लागवड वाढविणें जरूर आहे.

### लोंकरीचें कापड

हिंदुस्थानांत लोंकर गिरण्यांनीं तर जेथें शक्य होईल तेथें एक तरी जादा पाळी करून आपलें उत्पादन वाढविलें पाहिजे. हिंदी लोंकर गिरण्यांना दरवर्षी १ कोटी, ५० लक्ष रत्तल लोंकर लागते. ती आस्ट्रेलियांतून मिळविण्याकडे हिंदुस्थाननें अधिक लक्ष यावें. विणकामासाठी लागणारी यंत्रसामुग्री जपानकडून मिळूं शकेल.

### रेशमी कापड

हिंदुस्थानला प्रतिवर्षी ४० लक्ष रत्तल कच्चें रेशीम लागतें. १९४८ सालीं १५ लक्ष रत्तल खादी रेशीम व ५ लक्ष रत्तल तलम रेशीम पैदा होऊं शकेल; बाकीचें २० लक्ष रत्तल आयात करावें लागेल. पैकीं सुमारें ४ लक्ष रत्तल जपानमधून मागविण्यांत आलेंहि आहे. हिंदुस्थान सरकारच्या तातडतोबीच्या योजनेनुसार १९५० सालापासून १९ लक्ष रत्तल खादी रेशीम व १३ लक्ष रत्तल तलम रेशीम येथें पैदा होऊं लागेल व मग फक्त ८ लक्ष रत्तलांचीच तूट भरून काढावी लागेल. एक मध्यवर्ती रेशीम उत्पादक मंडळ नेमण्यांत यावें व त्यानें सर्वंकष विचारानें कार्ययोजना आखाव्या आणि जपानमधून आवश्यक ती यंत्रसामुग्री आणावी अशा निरीक्षकांच्या सूचना आहेत.

### रेयॉन

सध्यांची हिंदुस्थानची रेयॉन धाग्याची मागणी सुमारें २ कोटी ५० लक्ष रत्तलांची आहे. रेयॉन धागा काढणारे कांहीं कारखाने सध्यां उभारले जात आहेत. त्यांचें उत्पादन सुरू झालें कीं वरील पैकीं कांहीं मागणी त्यांचेकडून पुरी होऊं शकेल. हिंदुस्थान सरकारनें नुकताच जपानकडून २८ लक्ष रत्तल रेयॉन धागा आणविला आहे. त्याची प्रत व भाव सोयीस्कर ठरल्यास जपानकडून नेहमींच रेयॉन धागा मागविणें हिंदुस्थानला सोयीचें होईल.

अशा प्रकारचें ह्या निरीक्षक मंडळाच्या अहवालाचें स्वरूप आहे.

---

### ताळेबंदावर सही करण्यास मॅ. एजंटांचा नकार

इंडिया युनायटेड कंपनीचा, मार्च १९४८ अखेरचा ताळेबंद आणि नफातोट्या संबंधीचा अहवाल, ता. ३० डिसेंबर १९४८ रोजीं भरविण्यांत येणाऱ्या कंपनीच्या वार्षिक सभेंत मंजुरीकरतां मांडला जावयाचा आहे. परंतु कंपनीचे मॅनेजिंग एजंटस् मेसर्स मोरारका अँड कंपनी ह्यांनीं त्यावर सही केलेली नाहीं.

कंपनीच्या संचालक मंडळानें आपल्या अहवालांत ह्यासंबंधीं पुढीलप्रमाणें निवेदन केलें आहे. " आजपर्यंतच्या वहिवाटीप्रमाणें कंपनीच्या जवळील माल आणि इतर वस्तू ह्यांची यादी बरोबर असल्याचा शेरा मॅनेजिंग एजंटसनीं दिलेला नाहीं. असा दाखला अधिकृतपणें देण्याची विनंति संचालकांनीं केली असतांहि तो देण्यांत आला नाहीं. त्यामुळें मागील वर्षांच्या पद्धतीला अनुसरून ह्या वस्तूंचें मूल्यमापन मॅनेजरकडून करवून घ्यावें लागलें. श्री. रामकुमार श्रीनिवास मोरारका, मॅनेजिंग एजंटसच्या फर्मचे एक सभासद आणि कंपनीचे अधिकारपरत्वें असलेले डायरेक्टर, ह्यांना ताळेबंदावर सही करण्याचें सुचविण्यांत आलें असता त्यांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. जुलै, १९४८ मध्यें मॅनेजिंग एजंटस कंपनीचें काम करीनासे झाले, आणि त्यामुळें व्यवहार स्थगित होण्याची पाळी आली. कंपनीच्या सेक्रेटरीला हा प्रकार अध्यक्षांना कळवावा लागला. अध्यक्षांनीं संचालक मंडळाची एक सभा तातडीनें बोलाविली आणि वरील परिस्थिती संबंधीं मॅनेजिंग एजंट्सना खुलासा विचारला. मॅनेजिंग एजंट्सनीं झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त करून एका आठवड्यांत सर्व घडी नीट बसविण्याचें कबूल केलें आणि हें आश्वासन पाळलेंही. तथापि, वर पहिल्या प्रथम सांगितल्याप्रमाणें त्यांनीं पुन्हां गैरवागणूक केली. " असें समजतें कीं, अहवालांतील ज्या परिच्छेदांत वरील वस्तुस्थिती निवेदन केली आहे, तो गाळण्यांत यावा असें श्री. मोरारका ह्यांचें म्हणणें आहे. त्यांच्या मतानें वस्तुस्थिती तशी नाहीं. कंपनीचा अहवाल संचालकांनीं बहुमतानें मंजूर केलेला आहे. कंपनीच्या सबंद इतिहासांत पहिल्यानेंच इतका मोठा म्हणजे, १६, २२, २७४ रुपये तोटा झाल्याचें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. कंपनीला मागील सालीं २५,००,३१७ रुपये निव्वळ नफा झाला होता. उत्पादनाच्या खर्चांत वाढ, पगारांत वाढ, इत्यादि कारणांमुळें तोटा झाला असून ह्या वर्षी कंपनीच्या ऑर्डिनरी अगर प्रेफरन्स भागांवर नफा जाहीर करण्यांत येऊं नये, असें 'संचालक' मंडळानें सुचविलें आहे.

---

**अंदमान बेटांत विमानतळ**—अंदमानमध्यें वसाहत स्थापन करणें शक्य आहे असें ठरल्यामुळें, त्या बेटांत एक विमानतळ बांधण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. नागरी विमान वाहतूक खात्यातर्फे सध्यां त्या दृष्टीनें प्राथमिक पहाणीचें काम चालू करण्यांत आलें आहे. युद्धकालांतही अंदमानांतील विमानतळाचा उपयोग होईल हें गेल्या महायुद्धांत दिसून आलेंच आहे.

**मिठावरील निर्यातबंदी उठविली**—मद्रास प्रांताबाहेर मीठ नेण्याची बंदी मद्रास सरकारनें घातली होती, ती रद्द करण्यांत आली आहे.

पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह
व्याख्यान सातवें : १२-११-४८

# सहकारी चळवळीसंबंधी कांहीं स्फुट विचार

( श्री. द. ग. घेरवडेकर, एम. ए., एल्एल्. बी. )

प्राथमिक सहकारी संस्थांचा सभासद् असो अगर नसो, लायक शेतकऱ्यास लागणारें सर्व कर्ज सहकारी संस्थांनीं द्यावें असा सरकारी हुकूम निघाला असल्याचें समजतें. या बाबतींत चर्चा व विचार-विनिमय होण्यास व ह्या बाबतचें असेरचें मत प्रदर्शित करण्यास अद्यापीही अवसर आहे असें मला वाटतें. सहकारी सोसायट्यांनीं शेतकऱ्यांना कर्ज पुरविण्याची जबाबदारी आपणावर घेऊं नये व आपलें स्वातंत्र्य गमावूं नये असें माझें स्वतःचें प्रांजळ मत आहे. शेतकऱ्यांना दिलेलें कर्ज त्याचे कडून ठराविक वेळीं परत फिटेल असें मला मुळींच वाटत नाहीं. शेतकरी हा कर्जातून कायमचा मुक्त होईल असें माझ्या आजवरच्या अनुभवावरून तरी मला वाटत नाहीं. सबब ही अशक्य वाटणारी कामगिरी पार पाडण्याची जबाबदारी सहकारी सोसायट्यांनीं आपणावर घेऊं नये. ह्या कामासाठी गाडगीळ कमिटीनें सुचविल्याप्रमाणें स्वतंत्र ॲग्रिकलचरल क्रेडित कॉर्पोरेशन काढून हें काम तिच्याकडे सोंपवावें. सहकारी संस्थांनीं सर्व शेतकऱ्यांना कर्ज पुरविणें हा माझ्यामतें एक नवीन प्रयोगच आहे. परंतु प्रयोगासाठी सोसायट्यांनीं आपलें भांडवल गुंतविणें हें माझ्या दृष्टीनें धोक्याचें आहे. ह्या विषयासंबंधीं सहकारी मंत्र्यांची भेट घेऊन त्यांना मी हीं मतें व विचार सांगितले. शेतकऱ्यांना लागणारें अल्प मुदतीचें व लांब मुदतीचें कर्ज एकाच संस्थेमार्फत पुरविलें जावें असें मी सुचविलें. श्री. ध. रा. गाडगीळ यांनींही आपल्या रिपोर्टांत तसेंच म्हटलें आहे. हल्लीं लँड मॉर्गेज बँकांना कांहीं काम नाहींच. सबब त्यांचेकडे फारतर ही कामगिरी सोपवून त्यांना जीवदान द्यावें. माझे विचार नामदार मंत्र्यांना पटल्यासारखे दिसले नाहीं. त्यांच्या दृष्टीनें अल्प मुदतीचीं कर्जें व लांब मुदतीचीं कर्जें यांचीं सांगड घालणें योग्य होणार नाहीं. शिवाय लँड मॉर्गेज बँकांचा व्यवहार सेंट्रल बँकांच्या व्यवहारा इतका कार्यक्षम नसतो असेंही त्यांच्या बोलण्यावरून माझें मत झालें. अशी वस्तुस्थिति असली तरीही सेंट्रल बँकांनीं ॲग्रिकलचरल क्रेडिट कार्पोरेशनचं काम आपणाकडे घेऊन त्यांनीं आजवर संपादन केलेल्या चांगूलपणास गालबाट लागेल असें करूं नये, असें मला वाटतें.

ॲग्रिकलचरल क्रेडिट कार्पोरेशनचे काम मुंबई प्रांतांत तरी सहकारी संस्थांनीं करावें, असा आग्रह सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांनीं कां धरावा तें मला समजत नाहीं. कित्येक कार्यकर्त्यांना असें वाटतें कीं, ह्या कामासाठी स्वतंत्र संस्था निमार्ण झाल्यास ती शेतकी सहकारी पतपेढ्यांना मारक ठरेल व त्यामुळें सहकारी चळवळीस ओहोटी लागेल. परंतु माझे दृष्टीनें ही विचारसरणी कोती, भ्रामक व म्हणून चुकीची आहे. सहकारी चळवळीस नागरी क्षेत्र हें किती मोठें आहे व तेथें काम करण्यास किती मोठा वाव आहे तें सरय्या कमिटीच्या अहवालावरून सहज कळून घेण्यासारखें आहे.

× × ×

आपल्या प्रांतांत पुरेसे सहकारी कार्यकर्ते नाहींत तसेंच नवीन नवीन कार्यकर्ते निर्माण होत नाहींत अशी एक ओरड वारंवार ऐकूं येत असते. माझे मतें ही ओरड खरी नाहीं. या चळवळींत हल्लीं जी एक वतनदारी अगर गटबाजी निर्माण झाली आहे तिनेंच ही कोल्हेकुई सुरू केली आहे. माझें असें स्पष्ट मत आहे कीं पुरेसे कार्यकर्ते नाहींत व नवीन निर्माण होत नाहींत ही तक्रार सर्वथैव चुकीची व खोटी आहे. हल्लींची वतनदारी नष्ट झाल्याशिवाय नवीन कार्यकर्त्यांना पुढें येण्यास अवसरच मिळणार नाहीं. सबब ही वतनदारी नष्ट होण्यासाठी माझ्या मतें कायद्यांत अगर कानूंत अशी दुरुस्ती व्हावयास पाहिजे कीं ज्या योगें कार्यकारी अगर तत्सम मंडळावर निवडून येणारे प्रत्येक सभासदास ठराविक मुदतीनंतर निवडणुकीस उभे राहण्यास बंदी असावी. अशा इसमांच्या ज्ञानाचा अगर अनुभवाचा सहकारी चळवळीस फायदा मिळावा असें वाटत असेल तर जिल्हा निहाय अगर तालुका निहाय एक सल्लागार मंडळ निर्माण करून त्या मंडळावर या मंडळींनीं काम करून चळवळीस योग्य तें वळण देण्यास मदत करावी. त्यांनीं संस्थांच्या प्रत्यक्ष कारभारांत भाग घेऊं नये अगर त्यांत लुडबूड करूं नये. असें झालें तरच आपल्या चळवळींत हल्लीं दिसून येणाऱ्या वतनदारीस व गटबाजीस आळा बसून नवीन कार्यकर्त्यांना पुढें येण्यास वाव राहील.

× × ×

कांहीं लोकांनीं आपल्या स्वतःची अशी एक चुकीची समजूत करून घेतलेली दिसते कीं, ते वेगवेगळया संस्थांच्या कार्यकारी मंडळांत निवडून आले नाहींत तर त्या संस्था रसातळास जातील, ही समजूत अत्यंत भ्रामक आहे. संस्थेचा नोकरवर्ग हा खंबीर मनोवृत्तीचा, विश्वासू, प्रामाणिक, कामसू व सभासदांत मिळूनमिसळून वागणारा असा असला म्हणजे त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या मंडळावर कांहीं नवीन इसम निवडून आले तरी त्या संस्थेच्या मामुली कामकाजांत कांहींही फेरफार होऊं शकत नाहीं असें आपल्या शहरांतील नामवंत संस्थांच्या कारभारावरून माझें तर स्पष्ट मत झालें आहे. नोकरवर्ग हा पोलादी चौकटी सारखा टणक असावयास पाहिजे व तसा तो असला म्हणजे जुन्या व नव्या बोर्डांची सांधेजोड तो सहजी करूं शकतो असा माझा अनुभव आहे. सहकारी चळवळ ही विशेष भानगडीची नाहीं. ती नैतिक पायावर उभारलेली असल्यानें कोणाही नीतिमान, व्यवहारी व ज्याची सदसद्विवेकबुद्धि जागृत आहे अशा कार्यकर्त्यास तेथें योग्यता जबाबदारीनें सहजी काम करतां येतें. सहकारी चळवळ म्हणजे अणुबाँबचें संशोधन कार्यालय नव्हे.


## मागोरा केमिकल कं. लि.
## पुणें २.

कंपनी सध्या टिंक्चर्स, इंजेक्शन्स, पेटंट औषधें, कीटक नाशकें व सौन्दर्य प्रसाधनें इ. माल तयार करीत असून त्याचा खपही दिवसेंदिवस वाढत आहे. नवीन कांहीं खातीं चालू करावयाचीं असलेमुळें ठराविक रकमेपर्यंतच कांहीं ठेवी स्वीकारावयाच्या आहेत.

मुदत :— १, २ व ३ वर्षें
व्याजाचा दर:— ५, ५½ व ६ टक्के

कंपनीनें यंदा प्रेफरन्स शेअर्सवर ५ टक्के व ऑर्डिनरी शेअर्सवर ३ टक्के डिव्हिडंड जाहीर केलें आहे.

अधिक माहितीसाठीं लिहा:—

रा. य. रानडे, बी. ए.
मॅनेजिंग एजंट

## ए. बी. सी. बँकेच्या माजी सेक्रेटरीस शिक्षा

### बनावट लेटर ऑफ अलॉटमेंटचा उपयोग

असोसिएटेड बँकिंग कॉर्पोरेशनचे माजी सेक्रेटरी, महमद अली झवेरी, ह्यांना “कागदपत्र बनावट असल्याचे पूर्णपणें माहित असूनहि ते खरे आहेत असें दाखवून त्यांचा उपयोग केल्याचे” आरोपावरून मुंबईच्या सिटी सेशन्स कोर्टानें ३ वर्षें सक्त मजुरीची शिक्षा दिली. खटल्याची हकीकत अशी:—२२ जानेवारी, १९४७ रोजीं आरोपीनें राजस्थान इनव्हेस्टस लि. कडून तिचे एक डायरेक्टर श्री. रंगटा ह्यांचे मार्फत कर्ज घेतलें, त्यास ए. बी. सी. बँकेचे ४,६६५ शेअर्स तारण दिले. एका आठवड्यांत ह्या तारणाच्या शेअर्सची संख्या ८,००० करण्यांत यावयाची होती. ए. बी. सी. बँकेसंबंधीं कांहीं प्रतिकूल बातम्या श्री. रंगटांचे कानावर आल्या व त्यांनीं कर्जाची रकम परत मागितली. तेव्हां आरोपीनें त्यांना ए. बी. सी. बँकेवर ४ लक्ष रुपयांचा चेक दिला. तो वटविण्यासाठी श्री. रंगटा ह्यांनीं तो जयपूरच्या आपल्या पेढीकडे धाडला. बँकेनें पैसे देण्याचें बंद केलें आहे, असें समजल्यावर त्यांनीं तो चेक जयपूरहून परत मागविला आणि मुंबईमधील जयपूरच्या एका बँकेकडे वसुलीसाठी दिला. तो त्या बँकेनें अर्थातच परत केला, कारण ए. बी. सी. बँक बंद झाली होती.

९ एप्रिल, १९४७ रोजीं आरोपी श्री. रंगटा ह्यांचेकडे गेला व त्यांना भोपाळ स्टेट बाँडसचें ४ लक्ष रुपयांचें लेटर ऑफ अलॉटमेंट दिलें. त्याचे ४ लक्ष रुपये त्यानेंच भरले असल्याचें त्यानें सांगितलें. श्री. रंगटा ह्यांनीं मूळ चेक परत केला. हे बाँडस बनावट असल्याचें त्यांना मागाहून कळलें व त्यांनीं फिर्याद दाखल केली. “कर्ज मी घेतलें तें माझ्या सासऱ्याच्या वतीनें; व लेटर ऑफ अलॉटमेंट हेंहि माझ्या सासऱ्यानेंच दिलें. तें बनावट असल्याचें मला माहीत नव्हतें व माहीत असण्याचें कारणहि नव्हतें” असा आरोपीचा बचाव होता. आरोपीचा सासरा मि. कासमअली मंझी, हे त्यावेळीं ए. बी. सी. बँकेचे चेअरमन होते.

---

### दि पूना ऑइल मिल्स लि., पुणें ५

वरील खासगी लिमिटेड कंपनी गेल्या वर्षी नोंदण्यांत आली. तिचें अधिकृत भांडवल २ लक्ष रु. असून तें प्रत्येकीं १ हजार रुपयांच्या २०० ४½% क्यु. ऑ. शेअर्समध्यें विभागलेलें आहे. कंपनीचे पहिले चेअरमन कै. श्रीमंत बाबासाहेब साळवेकर हे होते. त्यांच्या जागीं आतां श्री. म. वि. शिंगरे ह्यांची योजना झाली आहे. कंपनीनें तेल गाळण्यास प्रारंभ केला असून तें बाजारांत विक्रीस आलें आहे. तेल उत्कृष्ट दर्जाचें, खात्रीचें व स्वच्छ असल्यामुळें त्यास कमालीची मागणी आहे. मिलसची यंत्रसामुग्री तज्ञांचे देखरेखीखालीं उभारण्यांत आलेली असून ती अत्यंत कार्यक्षम आहे. लहान आकाराचा धंदा यशस्वी कसा होऊं शकतो, हें स्पष्ट दाखवून देण्याचा चालकांचा प्रयत्न आहे, तो स्तुत्य आहे. “अर्थ”च्या वाचकांच्या परिचयाचे, श्री. व. वि. लोगकर, एम. ए., बी. कॉम., हे मॅनेजिंग एजन्सीचे प्रमुख भागीदार आहेत. कंपनीला शेअर्स व ठेवी ह्या दोन्हींच्या स्वरूपांत चांगला पाठिंबा मिळत आहे, असें समजतें. कंपनीच्या घाणी स्टेशन रस्त्यावर असून नोंदलेली कचेरी १२८६ अ, शिवाजीनगर, पुणें ५ येथें आहे.

---

### रिझर्व्ह बँकेचे शेअर्स

रिझर्व्ह बँकेच्या भागीदारांस त्यांच्या शेअर्सच्या मोबदल्यांत ३% १९७०–७५ च्या पहिल्या डेव्हलपमेंट कर्जाचे रोखे मिळतील.


पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

फोन नं. ४८३ — तारेचा पत्ता “Cencobank” — पोस्टबॉक्स नं. ५११

मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

सारस्वत

को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

[ स्थापना १९१८ ]



टे. नं. ३१६७५

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ४,१३,६१० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. २,५१,४०० |
| ठेवी ... | रु. ८६,७९,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ९४,३३,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

— विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा —

सब–ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

## रोख्यांच्या किंमतींमधील उतार

### तुलनात्मक आकडे

१९२७–२८ च्या किंमती १०० मानल्या, तर गेल्या वर्षाचे अवधींत त्या कशा उतरल्या हें खालील आकडे दर्शवितात:--

| | १९२७–२८ | नोव्हेंबर १९४७ | नोव्हेंबर १९४८ | घट |
|---|---|---|---|---|
| सरकारी रोखे | १०० | ११५·५ | ११४·८ | ०·७ |
| प्रेफरन्स शेअर्स | १०० | १६८·२ | १५७·१ | ११·१ |
| ऑर्डिनरी शेअर्स | १०० | १७६·५ | १५८·१ | १८·४ |

प्रेफरन्स शेअर्सपैकी कागदाच्या कंपन्यांचे शेअर्स सर्वांत ज्यास्त ( १६·२ ) घसरले. वहातुक कंपन्या व गिरण्या ह्यांच्या शेअर्सचे बाजारभावांत अनुक्रमें ०·४ व ४·२ एवढीच घट झाली.

ऑर्डिनरी शेअर्समध्यें लोखंड-पोलाद शेअर्स ७८·६ नें खाली आले. कागद कंपन्यांच्या शेअर्सचा खाली येण्यांत नंतर ( ५२·६ ) अनुक्रम लागतो. त्यानंतर विमा कंपन्या ( ४०·५ ), वहातुक ( २७·२ ), कोळसा ( २५·० ), बँका ( २२·० ), असा घटीचा अनुक्रम आहे. ब्र्युअरीजचे शेअर्स मात्र ११·४ नें सुधारले.

---

### महागाई कशी वाढत आहे ?

| | ऑगस्ट १९३९ अखेरचें वर्ष | ६–१२–४७ | ६–१२–४८ |
|---|---|---|---|
| खाद्य पदार्थ | १०० | ३०४·९ | ३९९·३ |
| औद्योगिक कच्चा माल | १०० | ३८८·३ | ४५१·१ |
| अर्धा-पक्का माल | १०० | २५४·४ | ३२७·९ |
| तयार माल | १०० | २८३·८ | ३४७·३ |
| इतर | १०० | ४५७ ४ | ५२८·८ |
| सर्व माल ( एकत्रित ) | १०- | २९८·१ | ३८२ ८ |

---

### म्हैसूर सिल्क फिलेचर्सला म्हैसूर सरकारचें ५ लक्ष रु. कर्ज

म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. नें मे, १९४८ मध्यें म्हैसूर सरकारकडे आपल्या १७½ लक्ष रुपयांच्या जिंदगीवर ५ लक्ष रुपयांचें कर्ज मागितलें. सरकारनें कंपनीचा ताळेबंद तपशीलवार तपासला व १½ लक्ष रुपये कर्ज तातडीनें देण्यांत आलें आणि आणखी ३½ लक्ष रुपये कर्ज अद्याप प्रत्यक्ष द्यावयाचें आहे. सरकारच्या अटी खालीलप्रमाणें आहेत:—( १ ) सरकारी डॉयरेक्टरांची संख्या २ ते ३ असावी. ( २ ) त्यांपैकी एकाची मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून नेमणूक व्हावी. ( ३ ) चेअरमन सरकारनियुक्त असावा. ( ४ ) सध्याच्या मॅनेजिंग एजन्सीची मुदत संपली म्हणजे ती रद्द व्हावी.

वरील कर्जाच्या अटींचा विचार करण्यासाठी कंपनीच्या भागदारांची सभा ता. ८ जानेवारी रोजीं भरणार आहे.


कृष्णा शुगर मिल्स लि.
कृष्णा–कित्तूर
कन्फेक्शनरी सुरू झाली.
धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.
६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.
विशेष माहितीसाठी लिहा.
पोस्ट:–कृष्णा–कित्तूर जिल्हा:–बेळगांव.
चिंचूरकर ॲण्ड को. मॅनेजिंग एजण्टस्.

दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)
पुणें शाखा:–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.
मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.– ब्रँच सेक्रेटरी










हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजिनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.